1 5 AUG 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्यदिनाची तयारी... विद्यापीठास तिरंगी रोषणाई..!



भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत शुक्रवारी तिरंगाच्या रंगांत आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात आज कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण

कोल्हापूर : भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते सकाळी आठ वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल.दरम्यान, शुक्रवारी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. ध्वजारोहण समारंभानंतर विद्यापीठ परिसरातून सायबर चौक मार्गावरुन तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विद्यापीठाचे सर्व अधिष्ठाता, विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक होते.

1 5 AUG 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शैक्षणिक धोरणात ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालकांची भूमिका महत्त्वाची

## शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय कार्यशाळेत मान्यवरांचे मत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालकांनी बदलत्या उच्च शिक्षण व्यवस्थेनुसार सक्रिय व सक्षम भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे मत राज्यस्तरीय कार्यशाळेत मान्यवरांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : विद्यापीठात कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्रा. प्रदीप खेडकर. समवेत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभाग, राज्य ग्रंथपाल महासंघ व अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांची भूमिका व आव्हाने' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा नुकतीच विद्यापीठात झाली. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. उद्घाटक म्हणून प्रा. प्रदीप खेडकर उपस्थित होते. डॉ. अनिल राव, प्रा. डॉ. रवींद्र भताने व डॉ. शिरीष पोपरे यांनी मार्गदर्शन केले. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. अजय साळी होते.

डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेच्या आयोजनात डॉ. आर. जी. पवार, डॉ. चेतना सोनकांबळे, प्रा. महेश केसरकर, डॉ. शार्दुल सेलुकर, डॉ. राहुल माने आणि डॉ. कृष्णा पवार यांनी योगदान दिले.

15 AUG 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिसरकारचे शोषणमुक्त समाजाचे स्वप्न 'जेन-झी'ने साकारावे

## डॉ. भारत पाटणकर; विद्यापीठात राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रतिसरकारची चळवळ ही केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचा लढा नसून स्त्रीमुक्ती, जातिव्यवस्थेचा अंत, जमीनदारशाहीविरोध आणि शोषणमुक्त समाजनिर्मितीचे व्यापक स्वप्न होते. हे स्वप्न अद्याप अपूर्ण असून, ते साकारण्याची जबाबदारी आता 'जेन-झी' पिढीने स्वीकारावी, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई पवार अध्यासन व क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ : रणरागिणी रणि ठाकल्या' या राज्यस्तरीय चर्चा सत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बीजभाषक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर.के. कामत होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या. डॉ. पाटणकर यांनी प्रतिसरकारच्या न्यायदान मंडळे, ग्रामस्वच्छता, वाचनालये, सहभोजन, 'एक गाव-एक पाणवठा' यांसारख्या उपक्रमांचा उल्लेख करत ही चळवळ सामाजिक समतेची पायाभरणी करणारी असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. कामत यांनी प्रतिसरकारमधील रणरागिणींच्या योगदानाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार असल्याची माहिती दिली.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात बीजभाषण करताना डॉ. भारत पाटणकर. सोबत आमदार अरुण लाड, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. भारती पाटील. (छाया : नाज ट्रेनर)**

आ. अरुण लाड यांनी जी. डी. बापू लाड यांच्या कार्याचा गौरव करत स्वातंत्र्यानंतर त्यांना तुरुंगात का डांबण्यात आले, यावर संशोधन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. चर्चासत्रात प्रतिसरकारमधील कर्तृत्ववान महिलांच्या योगदानावर विविध संशोधकांनी संशोधनपर मांडणी केली. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. दशरथ पारेकर, डॉ. कपिल राजहंस, वसंतराव मुळीक, डॉ. दीपा श्रावस्ती आदी उपस्थित होते.